**जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत १० + १ शेळी गट पुरवठा करणे या योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक : जिवायो-२०११/प्र.क्र.६२३/पदुम-४,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ११ नोव्हेंबर, २०११

वाचा – १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे पत्र क्र.एलव्हीस-२००९/ प्र.क्र.४०८/पदुम-४, दि.३१.०१.२०११.

२. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे पत्र क्र.एलव्हीस-२००९/ प्र.क्र.४०८/पदुम-४, दि.२०.०४.२०११.

३. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दि.१५.०६.२०११ अन्वये दि.१.६.२०११ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना –

विशेष घटक योजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत अनुसूचित जाती, नवबौध्द/अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना ग्रामीण भागात स्वयंरोजगाराद्वारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष घटक योजना,आदिवासी क्षेत्र उपयोजने अंतर्गत १० शेळ्या + १ बोकड तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत ५ शेळया + १ बोकडाचा गट ५० टक्के अनुदान व ५० टक्के लाभार्थी हिस्सा/वित्तीय संस्थेचे कर्ज या तत्वावर पुरवठा करण्याची योजना राज्यामध्ये कार्यान्वित आहे. सद्यस्थितीत शेळयांच्या बाजारामध्ये चांगल्या पैदासक्षम शेळयांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.

विविध शासकीय योजने (अनुसूचित जाती उपयोजना / आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजन)अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनेतील पशुधनाच्या खरेदीचे आधारभूत दर निश्चित करणे व सर्व योजनांसाठी अनुदान मर्यादा ७५ टक्के करणे यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५.१.२०११ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत विविध योजनेतील पशुधनाच्या आधारभूत किंमतीत वाढ करणे, त्याच प्रमाणे अनुदान मर्यादेत ७५ टक्के पर्यंत वाढ करणे संदर्भात सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने सहमती दर्शविली होती. त्याप्रमाणे शेळ्या व बोकड खरेदीच्या आधारभूत किंमतीत वाढ करण्यास दि.९.४.२०११ रोजीच्या मान्य टिप्पणीद्वारे मा.मुख्य सचिव यांनीही सहमती दर्शविलेली आहे.

राज्यात अंशतः ठाणबंद पध्दतीने शेळीपालन अंतर्गत १० शेळया + १ बोकड असा शेळी गट पुरवठा या विशेष योजनेस राज्यस्तरीय योजनांतर्गत योजना (सर्वसाधारण/ अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी क्षेत्र उपयोजना ) दि.१.६.२०११ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदर योजनेअंतर्गत उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या शेळीची आधारभूत किंमत प्रति शेळी रू ६,०००/- तर बोकडाची आधारभूत किंमत प्रति बोकड रु.७,०००/- आणि स्थानिक जातीच्या शेळीची आधारभूत किंमत प्रति शेळी रु.४,०००/- व बोकडाची आधारभूत किंमत प्रति बोकड रु.५,०००/- करण्यास त्याचप्रमाणे अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना १० शेळया + १ बोकड या गटाचा पुरवठा ७५ टक्के अनुदानावर करण्यासही मंत्रीमंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

रोटा/एच-२२७७[१५००-११-२०११]-१

C:\Users\pc\Desktop\Scp Tsp Goat nits GR.doc

जिल्हा परिषद, लातूर.
पशुसंवर्धन विभाग
कार्यासन :- ५
दिनांक :- १९।१२।२०११
अधि.क.अ. प.वि.अ. वि.प.स.अ. अ.नि.मु.का.अ.

या अनुषंगाने जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना / आदिवासी क्षेत्र उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत शेळयांचे गट पुरवठा या योजने अंतर्गत शेळयांच्या व बोकडाच्या आधारभूत किंमतीत व अनुदानाच्या मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजने अंतर्गत शेळयांचे गट पुरवठा करणे या योजनेच्या अनुषंगाने या पुर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय, शुध्दीपत्रक व परिपत्रके अधिक्रमित करून खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय --</u>

जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत १० शेळया + १ बोकड असा शेळी गट पुरवठा करणे या योजनेस याव्दारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. सदरची योजना सुधारित आर्थिक निकषानुसार सन २०११-१२ पासून राबविण्यात यावी.

योजनेचे स्वरुप (आर्थिक निकष) --

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या अथवा स्थानिक वातावरणात तग धरतील अशा स्थानिक प्रजातींच्या १० शेळया + १ बोकड पुरवठा करण्यासाठी शेळी गटाचा एकूण बाबनिहाय खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| क्र. | तपशील | दर | १० शेळया +१ बोकड रक्कम (रू) |
|---|---|---|---|
| १. | शेळया खरेदी | रू ६,०००/- प्रति शेळी<br>(उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या, पैदासक्षम)<br>रू ४,०००/- प्रति शेळी (अन्य स्थानिक जातीच्या पैदासक्षम) | रू ६०,०००/- (१० शेळया)<br>रू ४०,०००/-(१० शेळया) |
| २. | बोकड खरेदी | रू ७,०००/- १ बोकड<br>(उस्मानाबादी/ संगमनेरी जातीचा पैदासक्षम नर)<br>रू ५,०००/- १ बोकड (अन्य स्थानिक जातीचा पैदासक्षम नर) | रू ७,०००/- (१ बोकड)<br>रू ५,०००/- (१ बोकड) |
| ३. | शेळया व बोकडाच्या विमा (३ वर्षासाठी) | किंमतीच्या ५.७५ टक्के + १०.०३ टक्के सेवाकर या दराने | रू ४,२३९/- (उस्मानाबादी / संगमनेरी जातीसाठी)<br>रू २,८४८/-<br>(अन्य स्थानिक जातींसाठी) |
| | एकूण खर्च | | रू. ७१,२३९/-<br>(उस्मानाबादी / संगमनेरी जातीसाठी)<br>रू. ४७,८४८/-<br>(अन्य स्थानिक जातींसाठी) |

योजनेअंतर्गत पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि मराठवाडा विभागातील जिल्ह्यांमध्ये उस्मानाबादी आणि संगमनेरी या जातींच्या शेळया व बोकड यांचे गट वाटप करण्यात येतील. तर कोकण आणि विदर्भ विभागातील जिल्ह्यांमध्ये स्थानिक हवामानामध्ये तग धरणाऱ्या तसेच पैदासक्षम आणि उत्तम स्वास्थ्य असलेल्या स्थानिक जातीच्या शेळया व बोकड यांचे गट वाटप करण्यात यावे.

या योजने अंतर्गत १०+१ शेळयांच्या एका गटासाठी अनुसूचित जाती / जमाती प्रवर्गातील लाभार्थींना ७५ टक्के अनुदान म्हणजेच उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या गटासाठी रू. ५३,४२९/-तर अन्य स्थानिक जातीच्या गटासाठी रू. ३५,८८६/-शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

शासकीय अनुदाना व्यतिरिक्त उर्वरित २५ टक्के हिश्याची रक्कम लाभार्थ्यांनी स्वतः/बँकेकडून कर्ज घेवून (किमान ५ टक्के लाभार्थी हिस्सा व उर्वरित २० टक्के बँकेचे कर्ज) उभारावयाचे आहे. बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

लाभार्थी निवडीचे निकष -

या योजनेमध्ये लाभार्थी निवडीचे निकष खालील प्रमाणे असतील.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांची निवड खालील प्राधान्य क्रमानुसार करण्यात यावी.

प्राधान्यक्रम (उतरत्या क्रमाने)

१. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी

२. अत्यल्प भुधारक शेतकरी (१ हेक्टर पर्यंतचे भुधारक)

३. अल्प भुधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भुधारक)

४. सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)

५. महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र.१ ते ४ मधील)

लाभार्थी निवड समिती -

या योजने अंतर्गत लाभार्थींची निवड खालील जिल्हास्तरीय समिती मार्फत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | - | अध्यक्ष |
| २. जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जिल्हा परिषद ) | - | सदस्य |
| ३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - | सदस्य |
| ४. जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी (राज्यस्तर) | - | सदस्य |
| ५. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी | - | सदस्य |
| ६. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. (जि.प. मार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी)/सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय)(उपआयुक्त कार्यालयामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी) | - | सदस्य सचिव |

योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना

१. अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस सर्वप्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थींकडून अर्ज मागविण्यात यावेत.

२. योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांने करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासोबत जोडावयाची इतर आवश्यक कागदपत्रे याचा तपशील आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावर निश्चित करून तो क्षेत्रिय अधिकाऱ्यांना पाठवावा. तसेच सदर अर्जाचा नमुना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावा.

३. लाभार्थी निवडताना ३० टक्के महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

४. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.४१४/पदुम-४, दि.६.९.२०११ नुसार ३ टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत लाभ देण्यात यावा.

५. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी (पविअ-विस्तार) लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारून प्राप्त झालेले सर्व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद/जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करावेत. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी.

६. सन २०१२-१३ पासून लाभार्थ्यांकडून दरवर्षी जून/जुलै महिन्यामध्ये अर्ज मागविण्यांत यावेत. अर्ज स्विकारण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी. या मुदतीनंतर अर्ज स्विकारू नये. सदर अर्जाची वैधता हि त्या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेच्या अधिन राहील. तसेच कोणत्याही स्वरूपात सदरील अर्ज पुढील आर्थिक वर्षासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून एका महिन्याच्या कालावधीत जिल्हा निवड समितीमार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रतिक्षासुची तयार करावी.

या अनुषंगाने जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना / आदिवासी क्षेत्र उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत शेळ्यांचे गट पुरवठा या योजने अंतर्गत शेळ्यांच्या व बोकडाच्या आधारभूत किंमतीत व अनुदानाच्या मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजने अंतर्गत शेळ्यांचे गट पुरवठा करणे या योजनेच्या अनुषंगाने या पुर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय, शुध्दीपत्रक व परिपत्रके अधिक्रमित करून खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय –</u>

जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत १० शेळ्या + १ बोकड असा शेळी गट पुरवठा करणे या योजनेस याद्वारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. सदरची योजना सुधारित आर्थिक निकषानुसार सन २०११-१२ पासून राबविण्यात यावी.

योजनेचे स्वरुप (आर्थिक निकष) –

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या अथवा स्थानिक वातावरणात तग धरतील अशा स्थानिक प्रजातीच्या १० शेळ्या + १ बोकड पुरवठा करण्यासाठी शेळी गटाचा एकूण बाबनिहाय खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| क्र. | तपशील | दर | १० शेळ्या +१ बोकड रक्कम (रू) |
|---|---|---|---|
| १. | शेळ्या खरेदी | रू ६,०००/- प्रति शेळी (उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या, पैदासक्षम) रू ४,०००/- प्रति शेळी (अन्य स्थानिक जातीच्या पैदासक्षम) | रू ६०,०००/- (१० शेळ्या) रू ४०,०००/-(१० शेळ्या) |
| २. | बोकड खरेदी | रू ७,०००/- १ बोकड (उस्मानाबादी/ संगमनेरी जातीचा पैदासक्षम नर) रू ५,०००/- १ बोकड (अन्य स्थानिक जातीचा पैदासक्षम नर) | रू ७,०००/- (१ बोकड) रू ५,०००/- (१ बोकड) |
| ३. | शेळ्या व बोकडाच्या विमा (३ वर्षासाठी) | किमतीच्या ५.७५ टक्के + १०.०३ टक्के सेवाकर या दराने | रू ४,२३९/- (उस्मानाबादी / संगमनेरी जातीसाठी) रू २,८४८/- (अन्य स्थानिक जातीसाठी) |
| | एकूण खर्च | | रू. ७१,२३९/- (उस्मानाबादी / संगमनेरी जातीसाठी) रू. ४७,८४८/- (अन्य स्थानिक जातींसाठी) |

योजनेअंतर्गत पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि मराठवाडा विभागातील जिल्ह्यांमध्ये उस्मानाबादी आणि संगमनेरी या जातीच्या शेळ्या व बोकड यांचे गट वाटप करण्यात येतील. तर कोकण आणि विदर्भ विभागातील जिल्ह्यांमध्ये स्थानिक हवामानामध्ये तग धरणाऱ्या तसेच पैदासक्षम आणि उत्तम स्वास्थ्य असलेल्या स्थानिक जातीच्या शेळ्या व बोकड यांचे गट वाटप करण्यात यावे.

या योजने अंतर्गत १०+१ शेळ्यांच्या एका गटासाठी अनुसूचित जाती / जमाती प्रवर्गातील लाभार्थींना ७५ टक्के अनुदान म्हणजेच उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या गटासाठी रू. ५३,४२९/-तर अन्य स्थानिक जातीच्या गटासाठी रू. ३५,८८६/-शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

शासकीय अनुदाना व्यतिरिक्त उर्वरित २५ टक्के हिश्याची रक्कम लाभार्थ्याने स्वत:/बँकेकडून कर्ज घेवून (किमान ५ टक्के लाभार्थी हिस्सा व उर्वरित २० टक्के बँकेचे कर्ज) उभारावयाचे आहे. बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

७. जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थींची यादी आयुक्त पशुसंवर्धन तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी व निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्याबाबत कळविण्यात यावे.

८. योजनेसाठी लाभार्थीचे अर्ज मंजूर झाल्यावर लाभार्थींनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिस्याची रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील असे न केल्यास प्रतिक्षा सुचीवरील पुढील लाभार्थीस या योजने अंतर्गत लाभ देण्यात यावा.

९. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात यावा. या किंवा तत्सम योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येवू नये.

१०. या योजने अंतर्गत उस्मानाबादी/संगमनेरी किंवा स्थानिक जातीच्या पैदासक्षम शेळ्या/बोकडांची खरेदी प्राधान्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे यांचेकडून करण्यात यावी. महामंडळाकडे शेळया/बोकड उपलब्ध नसल्यास शेळयांच्या अधिकृत बाजारातून शेळ्या/बोकडांची खरेदी करण्यात यावी.

११. शेळी गटाची खरेदी लाभार्थ्यांच्या पसंतीने खालील समितीद्वारे करण्यात यावी.
शेळी गट खरेदी समिती

- संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती
- बँक प्रतिनिधी
- विमा प्रतिनिधी
- लाभार्थी

१२. लाभार्थ्यांकडे शेळीगट संगोपनासाठी पुरेशी जागा असावी.

१३. शेळी गटाच्या खरेदी नंतर वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा

१४. लाभार्थ्याने शेळी/मेंढी पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

१५. योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या शेळी गटाचे लाभार्थी व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या संयुक्त नावे ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

१६. योजनेंतर्गत पुरविण्यात आलेल्या शेळया/बोकड मृत पावल्यास विम्याच्या रकमेतून नवीन शेळ्या/बोकड खरेदी करणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.

१७. योजने अंतर्गत वाटप केलेल्या शेळ्या/बोकडामध्ये काही कायमपणाचे व्यंग उद्‌भवल्यास त्याची नुकसान भरपाई मिळण्यासाठी देखील विमा उतरविता येवू शकेल. तथापि, या विम्याचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने स्वतः करावयाचा आहे. यासाठी शासकीय अनुदान देय राहणार नाही..

१८. लाभार्थ्यास हा व्यवसाय किमान ३ वर्षे करणे आवश्यक राहील. लाभार्थीनी योजने अंतर्गत दिलेल्या शासकीय अनुदानाचा गैरविनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली महसुली कार्यपध्दतीने लाभार्थीकडून करण्यात यावी. तसेच अशा लाभार्थीस/कुटुंबास शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही विशेष घटक/आदिवासी क्षेत्र/ आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी क्षेत्र उपयोजने अंतर्गत पुढील ५ वर्षासाठी लाभ देण्यात येवू नये या साठी अशा लाभार्थ्यांची यादी संबंधित ग्राम पंचायतीस, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना पाठविण्यात यावी.

१९. योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीची यादी संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार), कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था व संबंधित ग्रामपंचायत यांचे स्तरावर उपलब्ध करून द्यावी.

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी तसेच कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्थांनी लाभार्थींची नोंद शेळी गटाच्या तपशिलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी व पाठपुरावा करावा.

२०. शेळ्यांचे गट वाटप केलेले लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील असतील त्या तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय दवाखान्यावरील पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक यांचे द्वारे सदर शेळी गटास आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात व त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीमध्ये घेण्यात यावी. तसेच सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत दर तिमाहीस वाटप केलेल्या शेळी गटाची लाभार्थी/पशुपालकाच्या घरी जाऊन १०० टक्के पडताळणी करण्यात यावी व त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्या मार्फत वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात यावा.

२१. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकूण शेळी गटाच्या २५ टक्के गटांची प्रत्यक्ष पडताळणी करावी तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्ह्यात फिरतीच्या वेळी वाटप केलेल्या एकूण शेळी गटांपैकी १०टक्के शेळी गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा.

२२. पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी ज्या ज्या वेळी शेळी गट पडताळणीसाठी भेट देतील त्या त्या वेळी अधिकाऱ्यांना शेळी गट दाखविणे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.

२३. वाटप केलेल्या शेळी गटातील शेळ्या/बोकडांना नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून आवश्यक रोगप्रतिबंधक लसीकरण करून घेणे, त्यांना जंतनाशके पाजणे ही सर्वस्वी जबाबदारी लाभार्थीची राहील.

२४. या योजनेसाठी वित्तीय कर्ज पुरवठ्यासाठीची आवश्यक तरतूद संबंधित जिल्ह्याच्या Potential Linked Credit Plan मध्ये करणेबाबत आयुक्त पशुसंवर्धन यांचे स्तरावरून सर्व संबंधितांना सुचना देण्यात याव्यात.

२५. या योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासून मिळणा-या उत्पन्नाचे अभिलेख ठेवण्यात यावेत तसेच सदर योजनेअंतर्गत केलेल्या कार्यवाहीबाबतच्या नोंदी नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेकडे ठेवण्यात याव्यात. ही माहिती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेमार्फत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी संकलित करुन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाला सादर करतील.

२६. योजना कालावधी संपल्यानंतर ६ महिन्यानी आयुक्त पशुसंवर्धन हे प्रत्येक विभागासाठी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून या योजनेचे मुल्यमापन सदर समितीद्वारे करतील. या अहवालानुसार आयुक्त पशुसंवर्धन हे सदर योजनेचा मूल्यमापन अहवाल अभिप्रायासह शासनास सादर करतील.

२७. आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनेअंतर्गत लाभार्थ्यांची यादी, केलेला खर्च, मुल्यमापन अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक तसेच संबंधित अप्पर आयुक्त, आदिवासी विकास व प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा.

२८. सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी)/ जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे (जि.प. मार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी) राहतील. विभागीय स्तरावर संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

२९. या योजने अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांकडून घ्यावयाचे बंधपत्र शासन निर्णयातील तरतूद विचारात घेवून आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावर अंतिम करावा व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्गमित करावा..

३०. सदर योजनेच्या आर्थिक निकषाच्या अधिन राहून योजना यशस्वीपणे राबवण्याकरिता आवश्यक त्या इतर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावरून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात.

अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजने अंतर्गत उपलब्ध तरतूदी खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात याव्यात.

१. अनुसूचित जाती उपयोजना

मागणी क्र. डी-४
२४०३-पशुसंवर्धन
१०४-मेष व लोकर विकास
(०४)-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०४)(०५)-मेंढ्या पैदास क्षेत्र — पैदाशीसाठी सुधारित जातीचे बोकड पुरविणे
विशेष घटक योजना (राज्य योजना)
३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)
(२४०३ १९४२)

२. आदिवासी क्षेत्र उपयोजना

मागणी क्र. टी-५
७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना
(०१)(१५)-महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ याच्या
कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदान (जिल्हा स्तर योजना)
३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)
(२४०३ १९९२)

३. आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना

मागणी क्र. टी-५
७९६-जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना
(०२)(०८)-विशेष पशुधन विकास कार्यक्रम (जिल्हास्तर योजना)
५७-पशुधन
(२४०३ १४८८)

हा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.११३/११/विघयो-१ दि.२७.७.२०११,आदिवासी विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४८/का-०९ दि.१०.०८.२०११ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४२७/११/व्यय-२ दि.३०.०९.२०११ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१११११११६३३१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नांवाने,

(डॉ. भा.ना. सबाईसोनकांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
४. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
६. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे मध्यवर्ती कार्यालये.
७. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
११. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती).
१८. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१९. संचालक, समाजकल्याण, पुणे.
२०. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर.
२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२३. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे-१६.
२४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२५. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
२६. विधानमंडळ ग्रंथालय (१० प्रती)
२७. उपसंचालक, लेखा व कोषागार, कोकण विभाग, कोकण भवन, नवीन मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती.
२८. सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
२९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३०. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त.
३१. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद.
३२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
३३. अवर सचिव, पदुम-३/१६, कक्ष अधिकारी पदुम-१, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३४. निवड नस्ती

-----------